कार्यमुक्त आदेश

जिल्हा परिषदेमधील अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रशिक्षण विषयक गरजांचे विश्लेषण करणेसाठी दि 15 व 16 नोव्हेंबर 2016 या दोन दिवसीय कार्यशाळेसाठी अधिकारी व कर्मचारी यांना कार्यमुक्त करणेबाबत.

जिल्हा परिषद, अहमदनगर
ग्रामपंचायत विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र रागांपंसअ/प्रशिक्षण/573/2016
दि. 08 नोव्हेंबर 2016

संदर्भ- मा संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे यांचेकडील पत्र क्र SIRD/यशदा दि 04/11/2016

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये जिल्हा परिषदेमधील अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रशिक्षण विषयक गरजांचे विश्लेषण करणेसाठी दोन दिवसीय कार्यशाळा दि 15 व 16 नोव्हेंबर 2016 या कालावधीत यशदा पुणे येथे आयोजीत करणेत आली आहे. सदर कार्यशाळेमध्ये खालील विषयावर सखोल चर्चा करणेत येणार आहे.

1) जिल्हा परिषद कर्मचारी सेवा विषयक बाबी (सेवेत हजर झालेपासुन ते सेवा निवृत्ती पर्यत)
2) आस्थापना, वर्तणुक, शिस्त व अपील आणि विभागीय चौकशी.
3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील महत्वाच्या तरतुदी व जिल्हा परिषद विषयक समित्या, पंचायत समिती सभा कामकाज बाबत कर्मचा-यांना आवश्यक असणा-या तरतुदी.

वरील प्रशिक्षण विषयक गरजांचे विश्लेषण (TNA) पुर्ण झाले नंतर जिल्हा परिषदेमधील 1 विषयाचे 2 याप्रमाणे 6 विषयासाठी 12 व्यक्तींसाठी प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TOT) आयोजित करावयाचे आहे व त्यानंतर तयार झालेल्या प्रशिक्षकांनी जिल्हा परिषद कर्मचा-यांना प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. उक्त नमुद प्रशिक्षण कार्यशाळेसाठी खालील तक्यात नमुद केलेनुसार अधिकारी व कर्मचारी यांना नामनिर्देशित करणेत येत आहे.

अ.क्र.	नामनिर्देशित अधिकारी/कर्मचारी यांचे नाव	पदनाम	विभागाचे नाव	शेरा
1.	श्री परिक्षित यादव	उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)	सामान्य प्रशासन विभाग	
2.	श्री सुभाष कराळे	कक्ष अधिकारी	पाणी व स्वच्छता कक्ष	
3.	श्री संभाजी भदगले	कार्यालयीन अधिक्षक	सामान्य प्रशासन विभाग	
4.	श्री विकास साळुंके	कनिष्ठ सहाय्यक	सार्वजनिक बांधकाम दक्षिण विभाग	
5.	श्री सुमित चव्हाण	वरिष्ठ सहाय्यक	सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग	

वरील नामनिर्देशित अधिकारी/कर्मचारी यांनी दि 15 व 16 नोव्हेंबर 2016 रोजी आयोजित 2 दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेसाठी दि 14 नोव्हेंबर 2016 रोजी सायं. 8:30 पर्यत किंवा दि 15 नोव्हेबर 2016 रोजी सकाळी 9:00 वाजेपर्यत यशदा पुणे येथे उपस्थित रहावे. त्याकरीता त्यांना दि 11 नोव्हेंबर 2016 रोजी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करणेत येत आहे.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 20161108060022 असा आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रति, संबधीत नामनिर्देशित अधिकारी व कर्मचारी.

प्रत- 1) मा संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे यांना माहितीस्तव सादर
2) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद अहमदनगर
3) उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्चच्छता कक्ष, जिल्हा परिषद अहमदनगर
4) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण/उत्तर), विभाग जिल्हा परिषद अहमदनगर

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर